# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 18.04.2024** **वार: गुरुवार**

---

**अधिसूचना**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठीची अधिसूचना आज जारी झाली. या टप्प्यात पुणे जिल्ह्यातील पुणे, शिरूर, मावळ तसंच नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या अकरा मतदारसंघात १३ मे रोजी मतदान होणार आहे. २५ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार असून २६ एप्रिलला अर्जांची छाननी होईल. २९ एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

**अर्जदाखल**

दरम्यान पुण्यात विविध पक्षांच्या उमेदवारांनी शक्तीप्रदर्शन करत आज अर्ज दाखल केले. बारामती लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, आरपीआय अध्यक्ष रामदास आठवले यांच्यासह अन्य नेते यावेळी उपस्थित होते.

या लोकसभा निवडणुकीत बारामतीमध्ये नवा इतिहास घडेल, असा विश्वास फडणवीस यांनी यावेळी झालेल्या जाहीर सभेत व्यक्त केला. देशाचा सर्वांगीण विकास करण्याचं काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. सुनेत्रा पवारांना मत म्हणजे नरेंद्र मोदींना मत आहे असं फडणवीस म्हणाले.

तर ही निवडणूक नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी अशी आहे; असं अजित पवार यावेळी म्हणाले. विकास काम करताना केंद्र आणि राज्य सरकारमध्ये समन्वय असावा लागतो; असं सांगून विकास कामांना साथ द्या, असं आवाहन अजित पवार यांनी केलं.

महाविकास आघाडीच्या बारामती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार सुप्रिया सुळे पुण्याचे उमेदवार रवींद्र धंगेकर, आणि शिरूरचे उमेदवार डॉक्टर अमोल कोल्हे यांनीही शक्तीप्रदर्शन करत आज आपापला उमेदवारी अर्ज भरला. यावेळी झालेल्या जाहीर सभेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सचिन अहिर, यांच्यासह अन्य नेते उपस्थित होते. वाढती बेरोजगारी तसंच पेट्रोल, घरगुती गॅस यांचे भडकलेल्या दरामुळे सर्वसामान्य जनतेला महागाईच्या झळा सोसाव्या लागत असून सत्ताधाऱ्यांना खाली खेचावं लागेल असं शरद पवार यावेळी म्हणाले.

सध्या देशाचा विकास दर साडेसहा टक्के असून हाच पुढे कायम राहिल्यास भारत जगातल्या पहिल्या तीन अर्थव्यवस्थेत स्थान कसं मिळवणार असा सवाल पृथ्वीराज चव्हाण यांनी उपस्थित केला.

**<u>प्रतिभा ताई पाटील</u>**

माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी पुण्यातील आपल्या निवासस्थानातून मतदानाचा हक्क बजावण्याची सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केली आहे. वयोवृद्ध नागरिकांसाठी घरातूनच मतदान करण्याची सुविधा त्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महर्षी कर्वे जयंती

महर्षि धोंडो केशव कर्वे यांच्या जयंतीनिमित्त पुणे महानगरपालिकेतील मुख्य भवनात असलेल्या महर्षी कर्वे यांच्या तैलचित्रास आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी आज पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**<u>पुनर्रोपण</u>**

मेट्रोमार्ग आणि दुमजली उड्डाणपुलासाठी पुण्यातील गणेशखिंड रस्ता रुंदीकरणात बाधा ठरणाऱ्या ७२ झाडांचं पुनर्रोपण करण्याच्या अटीवर उच्च न्यायालयाने ही झाडं काढण्याची परवानगी पुणे महापालिकेला दिली आहे. यामुळे गणेशखिंड रस्ता रुंदीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. गणेशखिंड रस्त्यावर मेट्रो ३ मार्गीकेचं काम सुरू आहे. तसंच विद्यापीठ चौकामध्ये दुमजली उड्डाणपूल उभारण्यात येत आहे. या कामामुळे पुलाच्या दोन्ही बाजूंनी रस्त्याची रुंदी कमी असल्याने महापालिकेने गणेशखिंड रस्ता ४५ मीटर रुंद करण्याचं काम हाती घेतलं आहे. परंतु याठिकाणी असलेली झाडं काढण्याला पर्यावरणप्रेमींनी विरोध केल्याने गेल्या सहा महिन्यांहून अधिक काळ हे काम रखडलं होतं.

**<u>टोरंटो संमेलन</u>**

टोरंटो इथल्या मराठी भाषिक मंडळ संस्थेतर्फे येत्या २१ एप्रिल रोजी ३६वं मराठी साहित्य संमेलन आयोजित केलं जाणार आहे. या संमेलनाच्या मानद अध्यक्षपदासाठी डॉ. संजय उपाध्ये यांची बिनविरोध निवड झाली आहे. मंडळाचे ज्येष्ठ सदस्य चंद्रशेखर मराठे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

<u>Pcmc</u>

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य खरेदी करण्यासाठी आता क्यूआर कोड दिला जाणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या प्रभागातील पुरवठादारांकडून शालेय साहित्य खरेदी करता येईल. महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील ४२ हजार, आणि माध्यमिक शाळांमधल्या ९ हजार, अशा एकंदर ५१ हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

**<u>क्रीडा</u>**

पुण्यात सुरू असलेल्या डॉक्टर्स प्रिमिअर लीग राष्ट्रीय अजिंक्यपद क्रिकेट स्पर्धा स्पर्धेत साऊथ दिल्ली मेडीकल असोसिएशन संघाने टायटन पुणे वॉरीयर्सचा ३९ धावांनी पराभव केला. अन्य एका सामन्यात नाशिक ब्लास्टर्स संघाने बॉम्बे मेडीकल असोसिएशन संघाचा ७ धावांनी निसटता पराभव करून सलग दुसरा विजय मिळवला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात तापमानात सतत वाढ होत असून उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. आज कमाल तापमान 40 अंश तर किमान तापमान 24 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या अंशतः ढगाळ हवामान असेल; तसंच तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचं वेधशाळेनं म्हटलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**